पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ५
सभावृत्तांत

दिनांक - ८.५.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ८.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.पाडाळे निता विलास
७) मा.जावेद रमजान शेख
८) मा.जगताप नवनाथ दत्तु
९) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१०) मा.भोसले राहुल हनुमंतराव
११) मा.चोंधे आरती सुरेश
१२)मा.भालेकर अरुणा दिलीप
१३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१४) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.प्रकाश कदम - अति.आयुक्त, मा.सावंत - सह आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.गायकवाड,मा.ढेरे,मा.टेकाळे,मा.झुरे,मा.दुरगुडे,मा.बंब-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.कांबळे- शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.चव्हाण - सह शहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.दुधेकर ,मा.ढगे, ,मा.चव्हाण, मा.जाधव, मा.कुदळे,मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात,मा.जाधव, मा.पठाण,मा.कुलकर्णी,मा.खाबडे- कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक १६) :- नालेसफाई कामासाठी ठेकेदाराची नेमणुक करणेबाबत..

विषय क्रमांक १७) :- मोबाईल खरेदीबाबत..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक १८) :- मानधनावर क्रीडा शिक्षकाची नियुक्ती करणेबाबत.. ..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक १९) :- पालखी सोहळा २०१२ करिता विठ्ठल रखुमाई मुर्ती खरेदीबाबत.. ..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २०) :- मनपाचे ब व ड प्रभागातील रस्ता दुभाजक / मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभालीबाबत.. ..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २१) :- वाहन भत्ता खर्चास मान्यता देणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २२) :- सांगवी जलतरण तलाव येथील फिल्ट्रेशन यंत्रणेचे काम करुन घेणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २३) :- ठराव क्र. ४२८ दिनांक २/५/२०१२ बाबत.. ..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २४) :- ठराव क्र.४०२ रद्द करणेबाबत.. ..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २५) :- ठराव क्र.४०६ मधे दुरुस्ती करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २६) :- साफसफाई आणि सुरक्षितता सेवा विषयक कामाबाबत.. ..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २७) :- निगडी येथील भक्ती शक्ती उद्यान देखभालीबाबत.. ..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २८) :- बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत म्युरल बनविणेबाबत..मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २९) :- प्रल्हाद सुधारे क्रीडांगण येथील कॅंटीन भाडेदराने चालविण्यास देणेबाबत..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३०) :- तरतुद वर्गीकरणाबाबत..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३१) :- छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३२) :- नाले साफसफाई कामाबाबत..मा.आरती चोंधे,मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव..

दिनांक २/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक - ४५७ विषय क्रमांक - १
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१५४/२०१२दि.१६/४/१२
विषय :- चापेकर चौक ते दळवीनगर आरओबी पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक १ कामीचे मा.आयुक्त यांचे विषयपत्र मा.आयुक्त यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४५८ विषय क्रमांक - २
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/९५/२०१२दि.२३/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विविध विभागांव्दारे सातत्याने छपाई साहित्याची मागणी होत असल्याने आणखी २ महिने कालावधीसाठी मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांना मिळालेल्या एकूण कामाच्या र.रू.२२,४४,५००/- च्या १५ % - र.रू.३,३६,६७५/- [र.रू.तीन लाख

छत्तीस हजार सहाशे पंच्याहत्तर] एवढ्या रक्कमेचे वाढीव काम करून घेणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४५९ विषय क्रमांक - ३
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - जलनि:सारण
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/३९५/२०१२दि.२७/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कासारवाडी येथे ४० एम.एल.डी. व सांगवी येथे २० एम.एल. डी. एकुण ६० एम.एल.डी. क्षमतेचे मैलाशुध्दीकरण केंद्र बांधणे व ३ महिने चालन आणि ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे कामाचे वाढीव र.रू.२=२३ कोटी खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६० विषय क्रमांक - ४
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/२१२/२०१२दि.२६/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुदप्रमाणे [अ.क्र.१ ते ६ एकुण खर्च र.रु.३,२१,२५१/-] महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०१२ करीता विविध साहित्य कालमर्यादा, तातडीची गरज लक्षात घेऊन खरेदी केलेले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६१ विषय क्रमांक - ५
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/६२२/२०१२दि.२६/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

आंद्रा/भामा आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड मनपासाठी पाणी आणणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे थेट पध्दतीने देण्याच्या प्रस्तावास व सर्वेक्षणाच्या कामासाठी प्रथमतः र.रू.३,००,०००/- [र.रू.तीन लाख] महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार विभाग, पुणे-१ यांना अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६२ विषय क्रमांक - ६
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - करआकारणी व करसंकलन
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कर/मुख्य/१/कावि/१४६/२०१२दि.२६/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.शुभम उद्योग यांनी ठेकेदारी पध्दतीने पुरविलेल्या कॉम्प्युटर ऑपरेटर कर्मचाऱ्यांची दि.२५/११/२०११ पासून ६ महिने मंजुर मुदतवाढीस अनुसरून किमान वेतन आयोगातील तरतुदी नुसार र.रू.७,६६३/- [र.रू.सात हजार सहाशे त्रेसष्ट] प्रति कर्मचारी प्रति महिना याप्रमाणे प्रत्यक्ष जादा अथवा वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६३ विषय क्रमांक - ७
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/७०/२०१२दि.३०/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मोशी कचरा डेपो येथे चैन बुलडोझर च्या सहाय्याने कचरा सपाटीकरण करणे कामासाठी मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांनी दिलेला दर निविदा दरापेक्षा -१३% कमी असल्याने तसेच कामाची निकड व तातडी लक्षात घेता मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांची -१३% कमी म्हणजेच प्रतितास र.रू.१,५७४/- या दराने र.रू.६१,७०,०८०/- [र.रू.एकसष्ट लाख सत्तर हजार ऐंशी] सर्व करासहीत या रक्कमेची निविदा मंजूर करणेस व त्याप्रमाणे निविदा अटी व शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करून त्यांना कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. [नि.र.रु.७०,९१,२८०/-]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६४ विषय क्रमांक - ८
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - उद्यान
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भ:-मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/३/कावि/१९९/२०१२दि.२/५/१२

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील लघुनिविदा क्र.३/२०११-२०१२ अन्वये, मनपाचे अ व ब प्रभागातील धोकादायक, वाळलेली, विकास कामात अडथळा ठरणारी व रस्ता रूंदीकरणात बाधीत होणारी झाडे स्वखर्चाने काढून विल्हेवाट लावणेकामी मे.महालक्ष्मी एन्टरप्रायजेस यांची र.रू.१,५५०/- प्रति टन या दराने आलेली निविदा सर्वात जास्त दराची असल्याने त्याचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रू.३,८०,०००/- [र.रू.तीन लाख ऐंशी हजार])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६५ विषय क्रमांक - ९
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - उद्यान
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/३/कावि/२००/२०१२दि.२/५/१२

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील लघुनिविदा क्र.३/२०११-२०१२ अन्वये, मनपाचे क व ड प्रभागातील धोकादायक, वाळलेली, विकास कामात अडथळा ठरणारी व रस्तारूंदीकरणात बाधीत होणारी झाडे स्वखर्चाने काढून विल्हेवाट लावणेकामी मे.महालक्ष्मी एन्टरप्रायजेस यांची र.रू.१,५५०/- प्रति टन या दराने आलेली निविदा सर्वात जास्त दराची असल्याने त्याचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.
(नि.र.रू.३,८०,०००/- [र.रू.तीन लाख ऐंशी हजार])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६६ विषय क्रमांक - १०
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/प्रकल्प/४१/२०१२दि.३०/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाला पावसाळ्यामध्ये Potholes बुजविणेकरिता आवश्यक असलेले ४८ बॅग (२.४० टन) खरेदीकामी Shell Bitumen India Ltd याकंपनीस र.रू.४९,०००/- [र.रू.एकोणपन्नास हजार] अदा केले असलेने सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६७ विषय क्रमांक - ११
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - ब प्रभाग विद्युत
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.बप्र/वि/जा/२१२/२०१२दि.२/५/१२

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग विद्युत विभाग कार्यक्षेत्रातील बळवंत कॉलनी, शिवप्रसाद कॉलनी, चिंचवडेनगर, स्वामी विवेकानंद सोसायटी, शेवंताबन सोसायटी, ओमसाई कॉलनी व मनपा दवाखाना वाल्हेकरवाडी परिसरातील स्ट्रिटलाईटकरीता वीजपुरवठ्याचे वीजमीटरकरीता म.रा.वि.वि.कं.ला र.रू.३८,१२४/- [र.रू. अडोतीस हजार एकशे चोवीस] अदा करणे आवश्यक असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६८ विषय क्रमांक - १२
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - भुमि आणि जिंदगी
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/सर्व्हे-१/कावि/११९/२०१२दि.३०/४/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचिंग स्टेशन उभारणेकरीता EWS project चिखली से.क्र.१७ व १९ मधील ५००० चौ.फुट जागा म.रा.वि.वितरण कंपनी यांना विनामोबदला हस्तांतरीत करणेस व त्यापोटीचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क मनपाने भरण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४६९ विषय क्रमांक - १३
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/१११/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जकात विभागासाठी आवश्यक प्रतिज्ञापत्र पॅड छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सू.क्रं.२१/३-२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ओम ऑफसेट प्रिंटर्स, भोसरी यांचे दर प्रती पुस्तक र.रु.३८/०४ एकूण र.रु.१३,३१,४००/- स्विकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७० विषय क्रमांक - १४
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/११०/२०१२दि.२/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या सार्वजनिक वाचनालय विभागास पुस्तके खरेदीकामी ई-निविदा सुचना क्र.२३/५/२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.जयेश एजन्सी, पुणे यांचेकडून १९९ पुस्तकांचा एक सेटप्रमाणे १५ वाचनालयांसाठी प्रत्येकी एक सेट र.रु.६८,०००/- मध्ये असे एकुण १९९ पुस्तकांचा एक सेट प्रमाणे १५ सेट २९८५ पुस्तके एकूण रक्कम रुपये १०,२०,०००/-मध्ये खरेदीकामी केलेला करारनामा संविधा अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७१ विषय क्रमांक - १५
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/११०/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जकात विभागासाठी आवश्यक एस्कॉर्ट पावती पुस्तके छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सू.क्रं.२१/२-२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ओम ऑफसेट प्रिंटर्स, भोसरी यांचे दर प्रती पुस्तक र.रु.३५/१८ एकूण र.रु.१४,०७,२००/- स्विकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक - ४७२ विषय क्रमांक - १६
दिनांक - ८/५/२०१२ विभाग - अ प्रभाग
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भः-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.प्र/आ-२/कावि/५२६/२०१२दि.८/५/१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रातील नाले सफाई कामासाठी निविदा नोटीस क्रमांक १ (१) / २०१२-२०१३ नुसार प्राप्त झालेल्या तिन निविदापैकी मे. सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट, नवी सांगवी, पुणे -२७ यांनी सादर केलेला निविदा रकमेच्या (निविदा रक्कम रुपये ८,१६,२९१/-) ३ टक्के कमी हा दर सर्वात कमी असल्याने त्यांची याकामी ठेकेदार म्हणून नेमणुक करणेस, त्यांचेशी आवश्यक त्या अटी शर्तींचा करारनामा करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७३ विषय क्रमांक - १७
दिनांक - ८/५/२०१२
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भः-मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

प्रस्तावात नमुद प्राप्त दराप्रमाणे मा.पदाधिकारी यांचेसाठी मोबाईल मे.एन.एस.जैन & कंपनी प्रा.लि.यांचेकडुन प्राप्त दरानुसार निविदा न मागवता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७४ विषय क्रमांक - १८

दिनांक - ८/५/२०१२

सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.च्रदकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामध्ये क्रीडा शिक्षक अभिनामाची पुरेशी पदे मंजुर नाहीत. त्यामुळे क्रीडा विभागामध्ये विविध खेळांच्या प्रशिक्षणासाठी मानधनावर क्रीडा शिक्षकांची नियुक्ती केली जाते. श्री. चव्हाण राजेंद्र प्रल्हाद हे क्रीडा शिक्षकपदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असल्याने त्यांना मानधनावर सहा महिन्यांसाठी क्रीडा शिक्षक म्हणुन नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७५ विषय क्रमांक - १९

दिनांक - ८/५/२०१२

सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.च्रदकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

पालखी सोहळा २०१२ करिता सालाबादाप्रमाणे १८ इंची उंच ब्लॅक मेटल धातूच्या विठ्ठल रुख्मिणी मूर्ती संत तुकाराम महाराज पालखी सोहळा व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा यांच्या दिंडी प्रमुखांना देण्यासाठी आल्हाट आर्ट स्टुडिओ, पुणे यांना बनविण्यासाठी ( किंमत रुपये २,४५०/- प्रति नग थेट पध्दतीने खरेदी करण्यास) मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७६ विषय क्रमांक - २०

दिनांक - ८/५/२०१२

सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.च्रदकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.७/२०१०-११ मधील अ.क्र.२ अन्वये ब व ड प्रभागातील रस्ता दुभाजक / मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभालीकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी (प्रतिमहा प्रति कि.मी. ९४७७ रु.) या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने व त्यांचे एक वर्षाचा कामाचा अनुभव चांगला असुन त्यांनी देखभाल उत्तमरीत्या केली असल्याने त्यांना पुढील तीन वर्षासाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.(निविदा रक्कम रु. ९,९१,६००/- )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७७ विषय क्रमांक - २१
दिनांक - ८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.आरती चोंधे,जावेद शेख यांचा प्रस्ताव -

माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. या विद्यालयातील इयत्ता १० वीचा SSC बोर्डाचा निकाल चांगल्या प्रकारे लागावा यासाठी विभागामार्फत विविध शालेय उपक्रम राबविले जातात. या अनुषंगाने जिल्हा परिषद पुणे, समाज कल्याण विभाग, एस एस सी बोर्ड, येथे शालेय कामानिमीत्त जावे लागते. या विभागांचा तसेच शाळेच्या व मुख्य कार्यालयाचा संपर्क असणे आवश्यक असते. त्यासाठी मा.आयुक्त यांचेकडील आदेशान्वये श्री.जाधव आर. जी सहा.शिक्षक यांची समन्वयक म्हणुन नेमणुक केलेली होती. त्यानुसार मनपा फिरती कर्मचा-याप्रमाणे कि.मी नुसार त्यांना कामकाजापोटी वाहन फिरती भत्ता अदा करणेत येत होता. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. श्री. जाधव आर.जी(सहा.शिक्षक) यांना समन्वयक म्हणुन कामकाज केलेल्या कालावधीतील वाहन फिरती भत्त्यापोटी अदा केलेल्या एकुण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७८ विषय क्रमांक - २२
दिनांक - ८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.आरती चोंधे,जावेद शेख यांचा प्रस्ताव -

सांगवी जलतरण तलाव येथील फिल्ट्रेशन यंत्रणेचे काम मे वरदायीनी एन्टरप्राईजेस यांचेकडुन निविदा न मागविता थेट पध्दतीने करुन घेणेस व दुरुस्ती कामी येणा-या र.रु. १२५०००/- चे खर्चास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४७९ विषय क्रमांक - २३
दिनांक - ८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.आरती चोंधे,जावेद शेख यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.४२८ दिनांक २/५/२०१२ अन्वये, महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. वि/मुका/४/कावि/२९५/२०१२ दि.१६/४/१२ चा विषय एक महिना तहकुब ठेवला आहे. सदरचा ठराव रद्द करणेत येत आहे व मा.आयुक्त यांचे डॉकेट प्रमाणे खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४८० विषय क्रमांक - २४
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदकः- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.४०२ दिनांक २४/४/२०१२ रद्द करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८१ विषय क्रमांक - २५
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदकः- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.४०६ दि.२४/४/२०१२ मधील "से.नं.२१" हा मजकुर वगळुन त्याऐवजी "प्रभाग क्र.२१" हा मजकूर तसेच "१ वर्ष" हा मजकूर वगळून त्याऐवजी "पाच वर्षे" हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८२ विषय क्रमांक - २६
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदकः- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. चे साफसफाई आणि सुरक्षितता सेवा पुरविण्याचे काम समाधानकारक असल्यामुळे पुढील तीन वर्षांकरीता कामाची मुदत वाढविताना, पहिल्या वर्षासाठीचे दर हे सद्य किमान वेतन दराप्रमाणे व इतर भत्ते तसेच मनुष्यबळाचे दर ग्राह्य धरुन तसेच सद्य मनुष्यबळाच्या संख्येत, साफसफाई साहित्य आणि वाहतुकीच्या दरात आणि इतर खर्चामधील दरवाढ ग्राह्य धरुन प्रति महा ४२,००,०००/- खर्चास, तसेच दुसऱ्या व तिसऱ्या वर्षासाठीच्या दरात त्या त्या वेळच्या किमान वेतनदराप्रमाणे मनुष्यबळाच्या किमतीत होणारी वाढ ग्राह्य धरुन व साफसफाई साहित्य व प्रवास खर्चात प्रति वर्षी दहा टक्के वाढीचे अटीवर साफसफाई व सुरक्षितता विषयक काम बी.व्ही.जी.इंडिया लि. यांचेकडून करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८३ विषय क्रमांक - २७
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक:- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

निगडी येथील भक्ती शक्ती उद्यान जोगेश्वरी एंटरप्रायजेस या संस्थेस २ वर्षे कालावधीसाठी अंशत: सेवाशुल्क तत्वावर देखभाल संरक्षणाकामी चालविण्यास देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८४ विषय क्रमांक - २८
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक:- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित म्युरल बसविण्यात यावे. प्रमुख २० प्रसंगांचे म्युरल्स् साईज ५ फूट X १० फूट ब्लॅक मेटलचे किंमत ६० लाख रुपये किंवा ५ फूट X १० फूट ब्रॉंझ धातूचे १ कोटी ३० लाख रुपये पर्यंतचे किंमतीचे बसविण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८५ विषय क्रमांक - २९
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:- मा.जावेद शेख,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

प्रल्हाद सुधारे क्रीडांगण येथील कॅंटीन महात्मा फुले स्वयंसहाय्यता बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेस मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडेदराने पाच वर्षे कालावधीकरीता देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८६ विषय क्रमांक - ३०
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक:- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

भोसरी गवळीनगर वॉर्ड क्र.१८ येथील जुने संडास ब्लॉक पाडुन ३० सिटसचा नवीन दुमजली संडास ब्लॉक बांधणे

| अ.क्र. | सन २०१२-१३ ची तरतुद | कामास लागणारी तरतुद |
|---|---|---|
| १) | १,००,०००/- | १,८५,०००/- |

वर्ग तरतुद करावयाचे कामाचे नाव :- वॉर्ड क्र.१८ मध्ये ठिकठिकाणी मुतारी व ब्लॉकची कामे करणे.

| अ.क्र. | सन २०१२-१३ ची तरतुद | तरतुद वर्ग करावयाची र.रु. |
|---|---|---|
| १) | ५,००,०००/- | ८५,०००/- |

वरीलप्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८७ विषय क्रमांक - ३१
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक:- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.निता पाडाळे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, यमुनानगर, निगडी येथे छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल नव्याने बांधण्यात आलेला आहे. सदर बॅडमिंटन हॉल, प्रबोधनकार क्रीडा विकास संस्था, से.नं.२१/९, स्किम नं.५, यमुनानगर, निगडी ही संस्था ११ महिने भाडे कराराने चालविणेस घेणेस इच्छुक आहे. तरी म.न.पा.च्या अटी शर्तीनुसार व योग्य त्या भाडे दरानुसार म.न.पा.चा छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल, यमुनानगर, निगडी हा प्रबोधनकार क्रीडा विकास संस्था, से.नं.२१/९, स्किम नं.५, यमुनानगर, निगडी या संस्थेस ११ महिने भाडे कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ४८८ विषय क्रमांक - ३२
दिनांक - ०८/५/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक:- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.आरती चोंधे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठ.क्र.४५२ दि.२/५/१२ रद्द करणेत येत आहे. आगामी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई होणे कामाची तातडी विचारात घेता ब,क,ड प्रभाग कार्यक्षेत्रातील नाले सफाईचे काम करणे आवश्यक असल्याने ब प्रभागातील नाले सफाईचे काम मे.महर्षी वाल्मीकी स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांचेकडुन व क आणि ड प्रभागातील नाले सफाईचे काम सिद्धीविनायक ट्रान्स्पोर्ट यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने करुन घेणेकामी ५० मजूर प्रति दिन ३००/- रुपये दराने उपलब्ध करुन घेवून करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/६९७/२०१२
दिनांक - ९/५/२०१२ चे लगत

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.